Vol 3 Issue 5 Nov 2013

Impact Factor : 1.9508 (UIF)

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 1.9508 (UIF)**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences,
University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature
Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore
University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science
YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-5, Nov-2013
ISSN 2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

# योजना मराठी भाषेतील मासिकांचे आशय विश्लेषण : एक अभ्यास (कालावधी – जानेवारी 2009– ते डिसेंबर 2010)

**दामोधर राऊत , दिपक कापडे**
ग्रंथपाल सर्वोदय महाविद्यालय, सिंदेवाडी, जि. चंद्रपुर
सहाय्यक ग्रंथपाल कविकुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, जि. नागपूर

***सारांश:*** 'आशय विश्लेषण' हे एक निश्चीत स्वरूपाची माहिती व प्रसार माध्यमांची अंतर्गत वैशिष्टये यावर केंद्रित झालेले संशोधन आहे. एखाद्या पाठयपुस्तकात किंवा अभ्यासक्रमात समाविष्ट असलेले विशिष्ट शब्द, संकल्पना, आशय वाक्यप्रचार, गुणवैशिष्टये किंवा वाक्य यांचा शोध घेण्यासाठी व या अंर्तभावाला वस्तुनिष्ठ पध्दतीने पात्र ठरविण्यासाठी अशा विश्लेषण पध्दतीचा वापर केला जातो.

एखादे पुस्तक, पुस्तकातील धडा, निबंध, मुलाखत, चर्चा, वृत्तपत्रातील मुख्य बातम्या, लेख, दस्ताऐवज, भाशण, संभाषण, जाहिरात, अनौपचारिक संभाषण, किंवा संवाद, भाषेचा वृत्तांत म्हणजे पाठयपुस्तक अशी पाठय पुस्तकाची ढोबळ मानाने व्याख्या करता येईल.

### *प्रस्तावना:*

बर्नाड बिरेल्सनी (Bernard Berelsen) केलेल्या व्याख्यानुसार आशय विश्लेषण म्हणजे " संवादाच्या प्रकट माहितीचे वस्तुनिष्ठ, सुव्यवस्थित व संख्यात्मक वर्णनासाठी वापरावयाचे संशोधनात्मक तंत्र होय."

Bernard Berelsen defined content analysis as " A research technigh for the objective, systematic and quantitative description of mainfiest content of communication"(Berelson 74)

कॅप्लॉन व गोल्डसन (Caplan and Goldsn) यांच्यामते " एखाद्या विषयासंबंधी निश्चीत केलेल्या गृहितकाच्या संदर्भात माहिती मिळविण्यासाठी शोधलेल्या वर्गवार माहितीच्या संख्यात्मक वर्गीकरणावर विषय विश्लेषणाच्या कटाक्ष असतो. "

According to caplan and goldson, " the content analysis aim at quantitative classification of a give body to content in terms of a system of categories devised to yield data relevant to specific hypothesis concerning that content. "

आशय विश्लेषण हा चिन्हांकीत शास्त्रीय माहितीमध्ये रूपांतर करावयाचा एक प्रयत्न आहे. तसेच अभ्यासाच्या उद्देशानुरूप मिळविलेल्या माहितीच्या गटविभागणीचे किंवा वर्गीकरणाचे साधन आहे. इलेक्ट्रॉनिक युगाचे ते एक उत्पादन आहे. आशय विश्लेषणाची प्रक्रिया 1940 पासुन सातत्याने जरी सुरू असली तरी 1950 मध्ये संशोधकांनी केवळ शब्द व त्यांचे भाशिक संबंध व त्याचा अंतर्भाव यापेक्षा संकल्पनेवर आपले अधिक लक्ष केंद्रित करणे सुरू केल्याने ती एक अधिक फायदेशीर व वारंवार वापरण्याजोगी प्रभावी संशोधन पध्दती बनली.

### *संक्षिप्त इतिहास :*

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या आर्शिवादाने 1957 साली प्रजासत्ताक दिनी पाक्षिकांच्या स्वरूपात योजनांची सुरूवात झाली. पहिली आवृत्ती इंग्रजी आणि हिंदी भाषेत प्रकाशित झाली. खुशवंत सिंग तयाचे मुख्य संपादक होते. हा अंक 20 पानाचा असून वृत्तपत्राच्या आकाराच्या कागदावर छापला गेला होता. यात पंचवार्षीक योजना आणि तिच्या अंमलबजावणी विषयी ज्यांना माहिती हवी होती. ती दिली गेली होती. यामागे पाक्षिकाच्या स्वरूपातील योजना येणा–या काळात सर्व प्रमुख भाषांत प्रकाशित होणारे साप्ताहिक होईल आणि त्याचे स्वरूपही रंगीत होईल ही आशा होती.

योजना आता हिंदी आणि इंग्रजीसह अन्य 11 भाषामध्ये प्रकाशित होत आहे. राष्ट्रीय स्तरावरील इंग्रजी आणि हिंदीत प्रसिध्द होणारे नियतकालिक आणि विभागीय स्तरावरही माहिती पोहोचविणारे अशी दुहेरी भूमिका बजावणारे, विकास कार्याला वाहून घेतलेले योजना हे एकमेव नियतकालिक आहे. तसेच विविध सामाजिक–आर्थिक विशय एकाचवेळी 13 भाषांतून प्रकाशित करणारे हे एकमेव मासिक आहे.

स्वातंन्र्याच्या रौप्यमहोत्सवाचा मुहूर्त साधून 15 ऑगस्ट 1972 पासून योजनाने आपली मराठी आवृत्ती सुरू केली. देशाच्या नियोजनासह सरकारच्या अन्य समाजपयोगी उपक्रमाची माहिती मराठी बांधवाना आपल्या भाशेत मिळू लागल्यामुळे योजनाला अल्पावधीतच लोकाश्रय मिळाला– श्री अविनाश गोडबोले यांच्या कुशल संपादनाखाली पाक्षिकाच्या स्वरूपात सुरू झालेला हा विविध माहितीचा खजिना यथावकाश (धोरणानुसार) मासिकात परावर्तित झाला. विद्वजनांबरोबर सर्वसामान्य लोकांचा योजनाला मिळत असलेला प्रतिसाद उत्तरोत्तर वाढतच आहे.

आत्तापर्यंतचा काळा हा प्रगतीचा काळ ठरलेला आहे. दरडोई उत्पन्न, आयुर्मान शिक्षण क्षेत्रातील प्रगती, अन्नाची सुरक्षितता, तंत्रज्ञानातील प्रगती, सामाजिक बदल आणि कित्येक बदल या काळात घडले. आपण वर्तमानपत्रे वाचत असलो किंवा दृकश्राव्य माध्यम पाहत असलो तर परिस्थिती फार बिकट आहे. हे लक्षात येते. हा विपर्यास थांबविण्याची गरज योजना करते आहे.

### *उद्देश :* (Object)

1.योजना मासिकामध्ये विविध विषयावर प्रकाशित झालेल्या लेखंचा अभ्यास करणे.
2.योजना मासिकातील प्रकाशित लेख किती पानाचे आहेत हे जाणून घेणे.
3.लेखकांच्या पदनामाचा अभ्यास करणे.
4.भौगोलिक परिस्थितीनुसार किती लेख प्रकाशित झालेले आहेत. हे तपासणे.
5.अर्थशास्त्रीय लेख लिहिणारे लेखक कोणत्या संस्थांशी निगडित आहेत. हे जाणून घेणे.
6.विविध लेखकांनी दिलेल्या लेखांचा अभ्यास करणे.
7.संदर्भसुचीचा अभ्यास करणे.

### *गृहितके :* (Hypothesis)

1.या मासिकामध्ये दोन लेखक मिळून लिहिलेले लेख जास्त प्रमाणात आहेत.
2.योजना मासिकातील लेख भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारे आहेत.
3.योजना मासिकातील जास्तीत जास्त लेख हे शासकीय काम करणा–या लेखकांचे आहेत.
4.योजना मासिकातील लेख हे 'दिल्ली' या मोठया शहरातून प्रकाशित झालेले आहेत.

### *व्याप्ती आणि मर्यादा* (Scope & Limitation)

प्रस्तुत अभ्यास 2009 ते 2010 या कालावधीतील नियतकालीकांच्या अभ्यासापर्यंत मर्यादीत आहे. यामध्ये एकूण 24 मासीके आहेत.

### *संशोधन पध्दती :*

सन 2009 ते 2010 या कालावधीतील एकुण 24 मासिकांचा अभ्यास करण्यांत येत आहे. या मासीकामध्ये छापलेल्या लेखांचा अभ्यास वरिल दिलेल्या

उद्देशाप्रमाणे करण्यांत आलेला आहे. याकरिता योजना मासीकांचे सर्व लेख पाहुन व शोधून किती लेख वेगवेगळया विशयांवर छापल्या गेले आहे. या लेखामध्ये किती पानाचे लेख आहेत, लेखकांच्या पदनामाचा अभ्यास आणि यामध्ये येणारे लेख कोणत्या भौगोलीक भागातून प्रसारित झाले आहेत. त्याचा अभ्यास करण्याकरिता लहान लहान कार्ड तयार करण्यात आले आहे. त्यामध्ये विषयाशी निगडीत, किती पानाचे लेख यामध्ये प्रकाशित झाले आहे. लेखकांचा पदनाम कोणत्या भौगोलिक ठिकाणाहून लेख प्रकाशित झाले आहे. याकरिता छोटे छोटे कार्ड तयार करण्यांत आले.

***तथ्य संकलन :*** (Data Analysis)

तथ्य संकलन म्हणजे माहिती प्राप्त किंवा संपादन करणे जे घटित झालेने आहे, स्थितीबोध निरिक्षण किंवा माहिती गोळा करणे होय.

***फेअरचाइल्ड :***

“ तथ्य एक घटना आहे की, जिच्या निरिक्षण आणि मापनाच्या विशयाबाबत सर्वांमध्ये अधिक प्रमाणात सहमत आढळून येते. ”

***तथ्यांचे सारणीयन आणि स्पष्टीकरण***

***योजना मासिकांतील विविध विषयांवरिल लेख :***

***सारणी क्र. 1.1***

| अ.क्र. | विषय | वारंवारिता | प्रतिशत |
|---|---|---|---|
| 1 | अर्थशास्त्र | 130 | 36.31 |
| 2 | समाजशास्त्र | 33 | 9.22 |
| 3 | लोकप्रशासन व राज्यशास्त्र | 28 | 7.82 |
| 4 | शिक्षणविषयक | 25 | 6.98 |
| 5 | साहित्य | 10 | 2.79 |
| 6 | कृषी | 09 | 2.51 |
| 7 | पर्यावरण | 12 | 3.35 |
| 8 | इतर | 111 | 31.02 |
| | एकूण | 358 | 100.00 |



योजना मासिकात प्रकाशित होणारे लेख हे विशेषतः समाजोर्थिक असतात.परंतू 2009–2010 या काळात प्रकाशित झालेले लेख हे सर्वच विषयावरिल असले तरी बहुतेक वेळा तया–त्या महिन्यात विशेष विषयाला आधारभूत मानून विशेषांक प्रसिध्द करण्यांत आलेले आहेत. जसे अर्थसंकल्प, पर्यावरण, व्यवस्थापन, क्रिडाक्षेत्र, अन्नसुरक्षा इ. काही वेळेला उत्तमपध्दती, चिंतनीय बाब, संपादकातर्फे वृत्तवेध, क्वचीत त्यांचे स्वतःचे लेखही प्रसिध्द केलेले आहेत. विषयानुसार प्रकाशित केलेल्या लेखांचा अभ्यास केला असता सर्वाधिक अर्थशास्त्र या विषयांवरिल आहेत. 130(36.31) तर कृषी या विषयावरील लेख हे सर्वात कमी म्हणजेच 9(2.51) इतके आहेत.

***लेखकाचे भौगोलिक स्थान :***

***सारणी क्र. 1.2***

| अ.क्र. | ठिकाण (जिल्हा) | वारंवारिता | प्रतिशत |
|---|---|---|---|
| 1 | मुंबई | 120 | 33.52 |
| 2 | औरंगाबाद | 31 | 8.66 |
| 3 | पुणे | 15 | 4.18 |
| 4 | नाशिक | 13 | 3.64 |
| 5 | कोल्हापुर | 29 | 8.10 |
| 6 | नांदेड | 23 | 6.42 |
| 7 | धुळे | 11 | 3.07 |
| 8 | इतर | 116 | 32.40 |
| | एकूण | 358 | 100.00 |



सारणी क्र. 1.2 वरुन असे दिसून येते की, योजना मासिकात प्रकाशित लेखांच्या लेखकांचे भौगोलिक स्थान हे वेगवेगळे आहेत.महाराष्ट्रातील बहुतेक जिल्हयामधून लेख प्रकाशित झालेले आहेत. अभ्यासाच्या दृष्टीने सोयीचे व्हावे यासाठी जास्त लेख असलेल्या जिल्हयांचे विभाजन केलेले आहे. इतर या गटात नागपूर, चंद्रपूर, अहमदनगर, रायगड इ. जिल्हयामधून प्रसिध्द होणा–या लेखकांचे वर्गीकरण आहे.भौगोलिकदृष्टया मुंबई येथून लेख लिहिणा–या लेखकांची संख्या सर्वाधिक 120 (33.52) आहे. तर धुळे येथील लेखकांची संख्या सर्वात कमी आहे. या जिल्हयां व्यतिरिक्त गडचिरोली, काटोल, भंडारा, गोंदिया इ. जिल्हयातील लेखकांची लेख नाहीत.

***मासिकातील लेखकांचे पदनाम :***

***सारणी क्र. 1.3***

| अ.क्र. | पदनाम | वारंवारिता | प्रतिशत |
|---|---|---|---|
| 1 | प्राध्यापक | 89 | 24.86 |
| 2 | डॉक्टरेट | 90 | 25.14 |
| 3 | प्रपाठक | 27 | 7.54 |
| 4 | पत्रकार | 91 | 25.42 |
| 5 | प्राचार्य | 05 | 1.40 |
| 6 | इतर | 56 | 15.64 |
| | एकूण | 358 | 100.00 |



सारणी क. 1.3 मध्ये योजना मासिकात लेख लिहिणा–या लेखकांच्या पदनामांची माहिती दिलेली आहे. लेखक हे केवळ प्राध्यापक, डॉक्टरेट, प्रपाठक, पत्रकार, प्राचार्य नाहीत. तर ते अर्थतज्ञ, कॉर्पोरेट लॉयर, ग्रंथपाल, वेगवेगळया संस्थांशी संबंधित महत्वपूर्ण पदावर कार्य करित आहेत. पुर्नवसन अधिकारी, जनकल्याण माध्यम अधिकारी, संशोधक विद्यार्थी आणि असेही काही लेखक आहेत की ज्यांच्या पदनामाबद्दल कोणतीही माहीती दिलेली नाही. त्यांचे लेख 2001 पासून या मासिकात प्रकाशित होत आहेत. उदा. धोंडिरामसिंह राजपूत, पत्रकार आणि डॉक्टरेट पदनाम असलेल्या लेखकांचे प्रमाण सर्वाधिक 50.56 इतके दोन्हीचे आहे. तर प्राचार्य पदावर काम करणा–या लेखकांचे प्रमाण सर्वात कमी 1.40 आहे.

### *लेखांच्या लेखकांची संख्या :*

**सारणी क. 1.4**

| अ.क. | लेखकांची संख्या | वारंवारिता | प्रतिशत |
|---|---|---|---|
| 1 | एक | 331 | 92.46 |
| 2 | दोन | 27 | 7.54 |
| 3 | दोन पेक्षा जास्त | 0 | 082 |
| | एकूण | 358 | 100.00 |



वरिल सारणी वरून असे दिसून येते की, 2009–2010 या कालावधतीत योजना मासिकातील लेख एकाच लेखकांद्वारे लिहिण्यात आलेले नाहीत. तर ते दोन लेखकांकडून लिहिण्यात आलेले आहेत. ही संख्या 27 (7.54) तशी कमी आहे. दोन पेक्षा जास्त लेखक कोणत्याही लेखाचे नाही आहेत.

### *प्रकाशित लेखांची पानमर्यादा :*

**सारणी क. 1.5**

| अ.क. | पानमर्यादा | वारंवारिता | प्रतिशत |
|---|---|---|---|
| 1 | 0 ते 2 | 81 | 22.63 |
| 2 | 3 ते 5 | 226 | 63.13 |
| 3 | 6 ते 8 | 42 | 11.73 |
| 4 | 8 पेक्षा जास्त | 9 | 2.51 |
| | एकूण | 358 | 100.00 |



वरिल सारणी व आकृती क. 1.5 वरून असे दिसून आली की, लेख लिहिण्याच्या पान मर्यादेत विविधता आहे. लेखक लेख लिहितांना त्यांच्यावर शब्द मर्यादेचे बंधन नाही. त्यामुळे लेख लिहिण्याचा उद्देश पुर्ण होईपर्यंत लिहिलेली आहेत.विशेषतः संशोधनात्मक लेखांची पानमर्यादा ही जास्त असल्याचे अवलोकनातून दिसून आले. 3 ते 5 पानमर्यादा असलेले लेख सर्वाधिक 226(63.13) इतके दिसून आलेत. तर सर्वात कमी 8 पेक्षा जास्त पानमर्यादा असणा–या लेखांची संख्या फक्त 9 (2.51) इतकी दिसून आली.

### *लेख लिहितांना उयोगात आणलेल्या संदर्भसूची :*

**सारणी क. 1.6**

| अ.क. | संदर्भसूची | वारंवारिता | प्रतिशत |
|---|---|---|---|
| 1 | होय | 56 | 15.64 |
| 2 | नाही | 302 | 84.36 |
| | एकूण | 358 | 100.00 |



वरिल सारणी आणि आकृती क. 1.6 वरून लेख लिहितांना लेखक पुस्तके, वेबसाईट, मासिके, वर्तमानपत्रे, समाचार, शोधनिबंध, प्रत्यक्ष मुलाखत इ. चा संदर्भकरिता उपयोग करून घेतात. 2009–2010 या काळात योजना मासिकात प्रकाशित लेखांसाठी फक्त 56 (15.64) लेखकांनी संदर्भसूची उपयोगात आणलेली आहे. संदर्भसूची माहिती मिळाल्यास लेखाच्या सत्यतेची पडताळणी सोपी जाते.

### *निष्कर्ष :–*

1.अर्थशास्त्र या विषयावरिल लेख जास्त आहेत. यात अर्थशास्त्राची संबंधित मुलाखत, अंदाजपत्रक, संशोधनपर लेख, भाषण इ. चा समावेश आहे.
2.मुंबई या ठिकाणहून लेख लिहिणा–या लेखकांशी संख्या जास्त आहे.
3.योजना मासिकात लेख लिहिणारे लेखक हे शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित प्राध्यापक पदावर कार्य करणारे आहेत.
4.लेख हे जास्त प्रमाणात एकाच लेखकाकडून लिहिण्यांत आलेले आहेत.
5.योजना मासिकाचे संपादकातर्फे लेख लिहिण्याची पानमर्यादा नसली तरी 3 ते 5 पानमर्यादा असलेले सर्वाधिक आहेत.
6.लेख लिहिताना फार कमी प्रमाणात संदर्भसूचीचा उपयोग करण्यांत आलेला आहे.

### *शिफारशी :*

1.महाराष्ट्रातील सर्वच जिल्हयातील लेखकांकडून लेख मागवून प्रकाशित करावे.
2.लेख लिहिणारे लेखक यांनी स्वतःचे पद व पत्ता योजना कार्यालयात पाठविल्यास मासिकात प्रकाशित करता येईल.
3.लेख हे सलग पानावर असल्यास अभ्यासतांना सोपे जाते.
4.प्रत्येक लेखाच्या शेवटी संदर्भग्रंथांची सूची द्यावी.

### *गृहितकाची सत्यता :*

1.या मासिकामध्ये दोन लेखकांमिळून लिहिलेले लेख जास्त प्रमाणात आहेत. उपलब्ध आकडेवारीवरून हे गृहितक पुर्णपणे खोटे ठरत आहे.
2.योजना मासिकातील लेख भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारे आहेत उपलब्ध आकडेवारीवरून हे गृहितक खरे ठरत आहे.
3.योजना मासिकातील जास्तीत जास्त लेख हे शासकीय काम करणा–या लेखकांचे आहेत. उपलब्ध आकडेवारीवरून हे गृहितक खरे ठरत नाही.
4.योजना मासिकातील लेख हे 'दिल्ली' या मोठया शहरातून प्रकाशित झालेले आहेत. उपलब्ध आकडेवारीवरून हे गृहितक खरे ठरत नाही.

***संदर्भसूची :***

1.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 35 अंक 6, जानेवारी 2009
2.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 35 अंक 7, फेब्रुवारी 2009
3.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 35 अंक 8, मार्च 2009
4.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 35 अंक 9, एप्रिल 2009
5.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 35 अंक 10, मे 2009
6.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 35 अंक 11, जून 2009
7.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 35 अंक 12, जुलै 2009
8.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 35 अंक 13, ऑगश्ट 2009
9.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 36 अंक 2, सप्टेंबर 2009
10.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 36 अंक 3, आक्टोबर 2009
11.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 36 अंक 4, नोव्हेंबर 2009
12.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 36 अंक 5, डिसेंबर 2009
13.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 36 अंक 6, जानेवारी 2010
14.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 37 अंक 7, फेब्रुवारी 2010
15.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 37 अंक 8, मार्च 2010
16.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 37 अंक 9, एप्रिल 2010
17.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 37 अंक 10, मे 2010
18.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 37 अंक 11, जून 2010
19.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 37 अंक 12, जुलै 2010
20.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 38 अंक 1, ऑगश्ट 2010
21.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 38 अंक 2, सप्टेंबर 2010
22.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 38 अंक 3, ऑक्टोबर 2010
23.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 38 अंक 4, नोव्हेंबर 2010
24.योजना मासिक, नवी मुंबई : वर्ष 38 अंक 5, डिसेंबर 2010
25.डॉ. प्रा. आगलावे, प्रदिप : संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपुर.
26.एलहान्स, वीणा आणि डी. एन. प्रॅक्टीकल प्राब्लेम इन स्टॅटीटीस्क इंण्डस्ट्रीयल प्रिंटर अलाहाबाद.
27.कोठारी सी. आर. : रिसर्च मेथडॉलॅजी, न्यू एज इंटरनॅशनल (पी) लिमिटेड, पब्लीशर्स.
28.सिन्हा वी.सी., गांधी एस.वी., राठी के. एम., व्यास एन.एच., सांख्यीकी के सिध्दांत, नॅशनल पब्लीशिंग हाऊस, नयी दिल्ली.
29.Hirwade, Mangala Anil Tankhane, Seema Sanjaykumar, Citation Analysis of Doctoral Research in Economics, ILA Bulletinn 2002, Vol.No.38: ( issue No.1), P.36 to 45
30.Kajberg,L.: Contnet Analysis of Library and Information Science, Serials published in Denmaark, 1957-1986 Library and Information Science Research, 18-1996 P.25
31.Kent(A), Ed.Encyclopedia of Library and Science-V.Z.,1987 Markel Dekkar, New York:P.190-199.
32.Krippendorff, K: Content Analysis, London, Sage Publications 1990
33.Kumar P.S.G.: Research Methods and Satistical Techniques, B.R.Publishing, Delhi.2004.
34.Narang A, Indian Journal of Pure and Applied Mathematics: Biblimatic Study, Annals of Library and, P.23-28.
35.Tankar, Amit S., Dharmapurikar R.G. and Mete, M. V. Content Analysis of Economics and Political Weekly, ILA Bulletin, 2002, Vol. No. 38 (issue No.2),P.52-56.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium     Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net